गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रकरणासंबंधी समिती नेमण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक पीओअेस १०८४/गो.मु.स.स्वा.सै.स/विकश/स्वासै,
मंत्रालय,मुंबई-४०००३२, दिनांक : ३० . . .

शासन निर्णय :- गोवा मुक्ती संग्राम देशाच्या स्वातंत्र्य लढयाचा भाग समजला जातो. म्हणून या लढयामध्ये भाग घेतलेल्यांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर सवलती मिळाव्यात अशा प्रकारचे अर्ज शासनाकडे प्राप्त झाले आहेत. तथापि त्याबाबतचे निकष वगैरे अद्याप न ठरल्यामुळे आतापर्यन्त या प्रकरणी निर्णय घेण्यात आलेला नाही. याबाबत दिनांक २४.७.८४ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये असे ठरले की, ही प्रकरणे तपासून शिफारस करण्यासाठी दोन सदस्यांची समिती नेमावी. त्याप्रमाणे खालील सभासदांची समिती नेमण्यात शासन मंजूरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.जयवंतराव टिळक, सभापती,महाराष्ट्र विधान परिषद | अध्यक्ष. |
| २. | श्री.पी.के.सावंत | सदस्य. |

सदरहू समितीने गोवामुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या खाली दर्शावलेल्या निकषांची पूर्तता करणा-या प्रकरणांची तपासणी करुन शिफारस करावयाची आहे.

याबाबतचे निकष खालीलप्रमाणे असावेत.

१. ज्यांनी भारतीय सरहद्द ओलांडली आहे व पोर्तुगिजांच्या प्रदेशात प्रवेश केला आहे असे.

२. भारतीय सरहद्दीच्या पलिकडे अथवा भूमिगत गोवामुक्ती संग्रामाच्या संदर्भात काम करीत असताना ज्यांना मार खावा लागला, तुरुंगवास किंवा त्रास सोसावा लागला आहे असे.

३. भारतीय सरहद्दीच्या पलिकडे उघड अथवा भूमिगत राहून गोवा मुक्ती संग्रामाच्या संदर्भात काम केले आहे.

४. ज्यांनी कोणाच्यातरी स्वातंत्र्य सैनिकांच्या नेतृत्वाखाली काम केले आहे. अशा नेत्याचे शिफारसपत्र तसेच हॉस्पिटलमधील कागदोपत्री पुरावा सादर केला आहे.

५. ज्यांची नांवे गोवामुक्ती संग्राम समितीच्या सत्याग्रहीच्या यादीत उपलब्ध आहेत.

६. ज्यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाने सन्मानपत्राव्दारे सन्मानीत केलेले आहे अथवा गोवामुक्ती स्वातंत्र्य सैनिक म्हणून मान्यता दिली आहे.

७. ज्यांनी सरहद्द ओलांडली नव्हती परंतु अलिकडे राहून सत्याग्रहीच्या संघटनेमध्ये राहून भूमिगत कार्य केले आहे.

वरील सातपैकी निकष क्रमांक १ व इतर पैकी कोणत्याही अेक किंवा अनेक निकषांचा कागदोपत्री पुरावा जे सादर करतील व ज्यांची प्रकरणे सदरहू समितीने शिफारस केली असेल त्यांची प्रकरणे स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

या समितीच्या शासकीय अशासकीय सदस्यांना प्रचलित नियमाप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिकभत्ता देण्यात यावा. [ या शासन निर्णयासोबतचे जोडपत्र पहा ].

शासनाचे अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग [ रोख शाखा ], यांना या समितीच्या अशासकीय सदस्यांच्या प्रवासभत्त्यांच्या बिलासंबंधी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, [ रोख शाखा ] यांना त्या बिलावर प्रतिस्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

या प्रस्तावावरील खर्च, " २५२- सेक्रेटरीएट व इतर सर्व साधारण सेवा [२] सचिवालय मागणी क्रमांक या अर्थसंकल्पीय शीर्षाच्या खर्च खाली टाकण्यात यावा व त्या खाली मंजूर केलेल्या अनुदानातून तो भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या संमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक - २८९/बियुडी/१३, दिनांक ३०.४.१९८५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

दा. प. कांबळे

[ दा. प. कांबळे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे सर्व सभासद,
श्री.जयवंतराव टिळक, सभापती, महाराष्ट्र विधान परिषद,
श्री.पी.के.सावंत,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,